| लातूर | वर्ष ३५ वे | अंक ९१ वा | बुधवार, दिनांक २४ जून २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## स्मार्ट मीटरच्या मुद्द्यावरून विधान परिषदेत चर्चा

## मुख्यमंत्री म्हणाले- १०० टक्के फिडरवर स्मार्ट मीटर लागलेत

### विधान परिषदेत गाजला वीज दरांचा मुद्दा



**मुंबई/प्रतिनिधी** विधान परिषदेत काँग्रेस आमदार सतेज पाटील यांनी विजेच्या दरांचा मुद्दा उपस्थित केला. ते म्हणाले की, रेट्रोस्पेक्टिव्हप्रमाणे ग्रीड चार्जेस का लागले. मुख्यमंत्र्यांकडून अपेक्षा आहे की, या विषयाकडे तुम्ही लक्ष दिले पाहिजे. फीडरवर तुम्ही मीटर लावा जेणेकरून नेमके कळेल की किती वीज या ठिकाणी जाते. माझी विनंती आहे की, सगळ्या घटकांना एकत्र बोलवा. एमएआरसीमधून जो अन्याय चालला आहे, त्यावर सरकार लक्ष घालत नाही तोपर्यंत हे दूर होणार नाही. दर कमी झाल्याचे सरकार म्हणते, पण प्रत्यक्षात चार्जेस वेगळे आहेत. इतर राज्यांपेक्षा वीजदर कमी झाल्याचं सांगितले जाते, पण ती वस्तुस्थिती नाही.

यावर उत्तर देताना मुख्यमंत्री म्हणाले की, एक क्षमता आपण ठरवली होती, की २००० मेगावॅट पूर्ण झाले की ग्रीड चार्जेस चालू करा, त्यानंतर ५००० मेगावॅट झाले की चालू झाले. ते बदल करायला तयार नाहीत, पण ग्रीड सपोर्ट चार्जेस म्हणजे काय, इट इज प्रॉफिट इन लॉस. हा ग्रीड सपोर्ट चार्ज का लावायला सांगितला, ही जी सोलारची वीज मिळते त्याचा ग्रीडवर दाब येतो, त्यामुळे जो खर्च वाढतो तो सामान्य ग्राहकावर जातो. हे होऊ नये म्हणून एमएआरसीने त्यांचे प्रॉफिट कमी केले आहे. दुसरे, आपण जे सांगितले, त्यात आता १०० टक्के फीडरवर स्मार्ट चार्जेस लागले आहेत. ग्रीड सपोर्ट चार्ज १ फेब्रुवारी पासून जो लावायला सांगितला आहे, त्यानुसार लावला आहे. २५-२६ मध्ये आपले जे विजेचे दर आहेत, ते आपण लावले आहेत. गुजरात आपल्यापेक्षा कमी आहे, पण आपले आता मल्टि इयर टॅरिफ झाला आहे. २०३० पर्यंत ते फायनल झाले आहेत. आपल्या वाढीचा जो कल आहे त्यानुसार २०२९ मध्ये आपण सर्वांत कमी असू. दोनच वर्षांनी आपण गुजरातपेक्षाही कमी जाऊ. महाराष्ट्रातील टॅरिफ हाय असते तर, आपल्याकडे उद्योगांमध्ये विजेचा वापर प्रचंड वाढला आहे. गेल्या दोन वर्षांत २० टक्के वापर वाढला आहे. पूर्वी वर्षांत २० टक्के वाढ होत नव्हती. अनेक वेळा लोक सांगताना सोयीचे स्टॅटिस्टिक देतात. तिसरे म्हणजे, ग्रीड सपोर्ट चार्जमधून पूर्वीएवढा किंवा त्यापेक्षा जास्त पैसा कमवायचा असेल, केवळ बॅटरी स्टोअरेजमध्ये गेलं तर प्रॉब्लेम सुटणार आहे. सामान्य लोकांचा लॉस करून इतरांचे प्रॉफिट करायचे हे काही योग्य नाही.

## लातूरमध्ये सामाजिक न्याय दिनानिमित्त

## समता दिंडी व संविधान

## जनजागृती प्रभातफेरीचे आयोजन



लातूर (जिमाका): राजर्षि छत्रपती शाहू महाराज हे सामाजिक न्याय प्रस्थापनेसाठी सदैव दक्ष होते आणि समाजातील दुर्लक्षित, मागासवर्गीय, दिव्यांग, वृद्ध, निराधार व दुर्बल घटकांच्या प्रती त्यांचा दृष्टिकोन विशेष सहानुभूतीचा व सुधारणावादी होता. त्यांनी या घटकांच्या कल्याणार्थ अनेक निर्णय अंमलात आणले. शाहू महाराजांचा हाच आदर्श समाजापुढे विशेषत्वाने यावा या दृष्टिकोनातून त्यांचा जन्मदिवस २६ जून हा प्रतिवर्षी 'सामाजिक न्याय दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. लातूरमध्येही यानिमित्ताने २६ जून रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

त्याअनुषंगाने २६ जून २०२६ रोजी सकाळी ७.४५ ते ८.४५ या वेळेत राजर्षि छत्रपती शाहू महाराज पुतळ्यापासून ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापर्यंत समता दिंडी व संविधान जनजागृती प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले असून, या पायी प्रभातफेरीचा मार्ग राजर्षि छत्रपती शाहू महाराज पुतळा-लोकशाहीर अण्णा भाऊ साठे चौक-गंजगोलाई-महात्मा गांधी चौक असा राहील आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे या प्रभातफेरीचा समारोप करण्यात येईल.

या समता दिंडी व संविधान जनजागृती प्रभातफेरीच्या माध्यमातून नागरिकांचे मूलभूत अधिकार व कर्तव्ये याबाबात जनजागृती करण्याच्या दृष्टीने संविधानातील कायद्यासमोर समानता, भेदभाव प्रतिबंध, अस्पृश्यता प्रतिबंध, अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे अधिकार व कर्तव्ये या विविध अनुच्छेदांची तसेच अस्पृश्यता निर्मूलनाची माहिती घोषणावाक्यांच्या माध्यमातून दिली जाणार आहे. तरी २६ जून २०२६ रोजी सकाळी ठीक ७.३० वाजता राजर्षि छत्रपती शाहू महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करून पुष्पहार अर्पण करण्यासाठी, तसेच या समता दिंडी व संविधान जनजागृती प्रभातफेरीत बहुसंख्येने सहभागी होण्यासाठी लातूर येथील शाळा, महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी आणि नागरिकांनी राजर्षी शाहू महाराज पुतळा येथे उपस्थित राहावे, असे आवाहन लातूर समाज कल्याण सहाय्यक आयुक्त यादव गायकवाड यांनी केले आहे.

## ०५ गुन्ह्यांची उकल करून २ लाख १० हजार रुपयांच्या सहा मोटारसायकली जप्त, एक आरोपी जेरबंद



**लातूर/प्रतिनिधी:**लातूर जिल्ह्यातील वाहनचोरीच्या गुन्ह्यांवर प्रभावी नियंत्रण मिळविण्यासाठी पोलीस अधीक्षक अमोल तांबे व अप्पर पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या पथकाने वाहनचोरीच्या पाच गुन्ह्यांची यशस्वी उकल केली आहे. या कारवाईत सतीश (वय ३४ वर्षे, रा. चनई, ता. अंबाजोगाई, जि. बीड) यास ताब्यात घेण्यात आले असून त्याच्याकडून २ लाख १० हजार रुपये किंमतीच्या सहा मोटारसायकली जप्त करण्यात आल्या आहेत. लातूर शहर व परिसरात घडलेल्या वाहनचोरीच्या गुन्ह्यांचा तपास सुरू असताना शिवाजीनगर पोलिसांना आरोपीबाबत गोपनीय माहिती प्राप्त झाली.

पोलीस निरीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने तात्काळ हालचाली करून संशयित आरोपीचा शोध घेत त्यास ताब्यात घेतले.

आरोपीची कसून चौकशी केल्यानंतर वाहनचोरीच्या अनेक गुन्ह्यांबाबत महत्त्वपूर्ण माहिती समोर आली.

तपासादरम्यान आरोपीकडून शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीतील दोन, गांधी चौक पोलीस ठाणे हद्दीतील दोन, लातूर ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीतील एक तसेच आंध्र प्रदेश राज्यातील एक अशा एकूण पाच गुन्ह्यांमधील सहा मोटारसायकली हस्तगत करण्यात आल्या. जप्त वाहनांची एकूण किंमत अंदाजे २ लाख १० हजार रुपये आहे.

या कारवाईमुळे विविध पोलीस ठाण्यांमध्ये दाखल असलेल्या वाहनचोरीच्या गुन्ह्यांची उकल होण्यास मदत झाली आहे. गुन्हेगाराकडून आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता असल्याने त्याच्याकडे सखोल चौकशी सुरू आहे.

सदर कारवाई समीरसिंह साळवे, उपविभागीय पोलीस अधिकारी, लातूर शहर यांचे मार्गदर्शनात संतोष पाटील, पोलीस निरीक्षक, शिवाजीनगर पोलीस ठाणे यांच्या नेतृत्वात सहाय्यक फौजदार संजय फुलारी, पोलीस अंमलदार राहुल सोनकांबळे, बालाजी कोतवाड, प्रशांत ओगले, किशोर माने, परमेश्वर अंकुलगे आणि नारायण शिंदे यांनी केली आहे.

## तरुणाच्या तोंडावर गरम तेल ओतून खून

**प्रॉपर्टी व अनैतिक संबंधाच्या वादातून प्रकार**

**उदगीर/प्रतिनिधी:** प्रॉपर्टीच्या वाटणीचा व अनैतिक संबंधाचा वाद विकोपाला गेल्याने एका २४ वर्षीय तरुणाचा खून झाल्याची घटना उदगीर ग्रामीण हद्दीत घडली आहे. उदगीर ग्रामीण पोलिसांनी याप्रकरणी महिलेसह एका आरोपीवर BNS कलम १०३(१) अंतर्गत गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी मारोती नरसिंह दहीकांबळे वय ७०, रा. नाबंदी ता. उदगीर यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांचा मुलगा उध्दव मारोती दहीकांबळे वय २४ हा संत ज्ञानेश्वर नगर, निडेवन उदगीर येथे भाड्याच्या घरात राहत होता. दि. १२/०६/२०२६ रोजी रात्री ०२:३० वाजण्याच्या सुमारास वंदना रा. नाबंदी ह.मु. उदगीर हिने उध्दवसोबत असलेल्या अनैतिक संबंधातून आणि त्याच्या वाटणीला येणारी जमीन/प्रॉपर्टी स्वतःच्या नावावर करून घेण्याच्या कारणावरून त्याच्या तोंडावर गरम तेल ओतले.

गंभीर भाजल्याने उध्दववर लातूरच्या सरकारी दवाखान्यात उपचार सुरू होते. मात्र उपचारादरम्यान दि. २२ रोजी पहाटे ०४ :३०वाजता त्याचा मृत्यू झाला. मयत उध्दवच्या वडिलांच्या फिर्यादीवरून दि. २३/०६/२०२६ रोजी ००३४ वाजता उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्ह्याची नोंद पोउपनि गजानन काळे यांनी केली असून पुढील तपास सपोनी माधव बेंबडे यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. दि. २३/०६/२०२६ रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन भातलवंडे, पोनी दिलीप गाडे, सपोनी माधव बेंबडे यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा व तपासकाम केले.

जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने गरम गोडतेल तोंडावर ओतून जिवे ठार मारण्यास कारणीभूत होते मयताचे भाड्याचे घर, संत ज्ञानेश्वर नगर, निडेवन उदगीर, शहरालगतचा भाग पोलिसांनी वंदना हिला ताब्यात घेऊन अधिक तपास सुरू असल्याचे सांगितले.

## ऊर्जा संवर्धन पुरस्कार विजेत्यांचा प्रश्न ऐरणीवर

### ट्रॉफी दुरुस्तीसाठी निविदा, पण पुरस्कार वितरणाचा पत्ताच नाही

----------------------

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या ऊर्जा विभागाकडून सन २०२०-२१ या वर्षातील खराब झालेली स्मृतीचिन्हे (ट्रॉफी) दुरुस्त करण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात येत असल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, याच कालावधीतील राज्यस्तरीय ऊर्जा संवर्धन पुरस्कारांचे वितरण अद्यापही झाले नसल्याने पुरस्कार विजेते आणि ऊर्जा क्षेत्रातील तज्ज्ञांमध्ये आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

विशेष म्हणजे, गेल्या पाच वर्षांत राज्यस्तरीय ऊर्जा संवर्धन पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आलेले नाही. परिणामी, निवड झालेल्या अनेक पुरस्कार विजेत्यांना अद्याप सन्मान स्वीकारण्याची संधी मिळालेली नाही. या विलंबामुळे काही पुरस्कार विजेते शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले आहेत, तर काही अधिकाऱ्यांच्या राज्यातील विविध शहरांमध्ये बदल्या झाल्या आहेत. काही अधिकारी पुढील काही महिन्यांत सेवानिवृत्त होण्याच्या मार्गावर आहेत.

ऊर्जा संवर्धन आणि ऊर्जा कार्यक्षमतेच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या उद्योग, संस्था, शासकीय कार्यालये आणि व्यक्तींना दरवर्षी हे पुरस्कार दिले जातात. मात्र, २०२०-२१ नंतर पुरस्कार वितरण प्रक्रिया रखडल्याने संबंधितांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. शासनाकडून ट्रॉफी दुरुस्तीसाठी निविदा काढली जात असताना, प्रत्यक्ष पुरस्कार वितरणाबाबत कोणतीही ठोस घोषणा करण्यात आलेली नाही.

ऊर्जा क्षेत्रातील जाणकारांच्या मते, ऊर्जा संवर्धनासाठी उल्लेखनीय काम करणाऱ्यांचा वेळेत गौरव होणे आवश्यक आहे. पाच वर्षांचा विलंब हा पुरस्कारांच्या उद्देशालाच हरताळ फासणारा आहे. शासनाने तातडीने पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करून प्रलंबित पुरस्कारांचे वितरण करावे.

दरम्यान, ऊर्जा संवर्धन क्षेत्रातील विविध संस्था आणि पुरस्कार विजेत्यांनी महाराष्ट्र शासन व संबंधित विभागाकडे लवकरात लवकर पुरस्कार वितरणाचा निर्णय जाहीर करण्याची मागणी केली आहे.

## प्रभात किरणे

दिसे सुंदर,भरजरी कपडे अंगावरी
काय उपयोगी जनास,कपट अंतरी
न संवाद,न व्हावी गाठभेट तयाची
सुखी जीवनात भर घाली दुःखाची

-इंजि. नागनाथ कलवले
लातूर ९७६४७ ८८२८८

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**पुढील ८ दिवस राज्यात मुसळधार पावसाचा इशारा...**



## चिमटा दयाचा

वाहातुकीची कोंडी फोडण्यासाठी कितीही उपायोजना केली तरी लातूरात शिस्त लावणे आवघड आहे ! करण बेशिस्तीने वागणारे अधिक आहेत!!

## साखर उद्योगात मांजरा साखर परिवाराची दरात उच्चांकी

### क्रांतिकारी शेतकरी संघटनेकडून माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचे आभार



**लातूर/प्रतिनिधी:** लातूरच्या मांजरा साखर परिवाराने मराठवाडा विदर्भ खानदेश या तीन विभागांमध्ये उस उत्पादक शेतकऱ्यांना उच्चांकी दर दिल्याबद्दल राज्याचे माजी मंत्री, मांजरा परिवाराचे मार्गदर्शक सहकार महर्षी दिलीपरावजी देशमुख साहेब यांचा क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने सोमवारी आशियाना निवासस्थानी येवून आभार व्यक्त केले व शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला

**राज्यातील साखर उद्योगानी मांजरा पॅटर्न चां आदर्श घ्यावा क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे नेते सत्तार पटेल यांचे प्रतिपादन**

यावेळी बोलताना सत्तार पटेल यांनी गेल्या हंगामामध्ये गाळपास आलेल्या उसाला ३१७७ रुपयापर्यंत उच्चांकी दर मांजरा साखर परिवाराने दिला असून आज महाराष्ट्रामध्ये वेगळे चित्र पहावयास मिळत आहे कुठे दुसरा हंगाम सुरू होत आहे तरी गेल्या हंगामातील एक रुपया सुद्धा बिल दिले नाही असे बरेच कारखाने असताना दुसऱ्या बाजूला पहिला हप्ता दिला त्याच्यानंतर एक रुपयाही अद्याप दिला नाही व देण्याच्या मानसिकतेमध्येही नाहीत तसेच बरेच कारखानदार कारखाना बंद करून फरार असल्याचे उदाहरण ही काही कमी नाहीत परंतु अशा परिस्थितीमध्ये मांजरा परिवाराने उच्चांकी दर दिल्याने लातूर पॅटर्न हा सर्वच विभागांमध्ये दिसून येत आहे जसा मांजरा परिवाराने सबंध महाराष्ट्राला एक आदर्श घालून दिला तो आदर्श इतर साखर कारखान्यानी घ्यावा असे आवाहन त्यांनी करत पश्चिम महाराष्ट्रामध्ये दर वर्षी आंदोलन केल्याशिवाय बिल मिळत नाही वाढीव बिल मिळत नाही दरवर्षी आंदोलन करण्याची पाळी येते परंतु लातूरमध्ये आंदोलन न करता ३२०० च्या जवळपास दर दिला जातो आता एफ आर पी वाढल्यामुळे निश्चितच येणाऱ्या हंगामामध्ये याहीपेक्षा जास्तीचा दर मिळेल अशी अपेक्षा त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केली

याप्रसंगी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष सत्तार पटेल प्रदेश अध्यक्ष राजीव कसबे कोर कमिटी सदस्य राजेंद्र मोरे,शेतकरी संघटनेचे जिल्हा अध्यक्ष अरुणदादा कुलकर्णी, युवा आघाडीचे जिल्हा अध्यक्ष रजत हुडे राज्य साखर महासंघाचे संचालक आबासाहेब पाटील विलास साखर कारखान्याचे उपाध्यक्ष वैजनाथराव शिंदे यांच्यासह स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अहमदपूर-उदगीर रस्त्यासाठी ३०० कोटी मंजूर

**उदगीर /प्रतिनिधी:** अहमदपूर ते उदगीर यारस्त्याच्या विकासासाठी शासनाने तब्बल ३०० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असल्याची माहिती माजी मंत्री आ. संजय बनसोडे यांनी दिली. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या रस्त्याचा प्रश्न मार्गी लागल्याने परिसरात समाधानाचे वातावरण आहे.अहमदपूर- उदगीर हा रस्ता मराठवाड्यातील वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. या मार्गावर खड्डे आणि अपुऱ्या सुविधांमुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. अनेकदा अपघातांच्या घटनाही घडत असल्याने या रस्त्याच्या दुरुस्ती व रुंदीकरणाची मागणी माजी मंत्री आ. बनसोडे यांनी सातत्याने केली होती. यासाठी त्यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठका घेऊन राज्य शासनाकडे वारंवार निवेदने सादर केली होती. त्यांच्या या प्रयत्नाला यश आले असून पूर्णा पालम राणीसावरगाव-काळेगाव - अहमदपूर - शिरुर ताजबंद -हाळी उदगीर या राज्यमार्गे २४९ साठी ३०० कोटी रुपयांच्या निधीस मंजुरी मिळाली आहे. रस्त्याचा प्रश्न मार्गी लावल्याबद्दल नागरिकांनीही आ. बनसोडे यांचे आभार व्यक्त केले आहे.

### लवकरच रस्त्याच्या कामाला सुरुवात होईल



माजी मंत्री आ. बनसोडे म्हणाले, अहमदपूर ते उदगीर रस्त्याचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित होता. या मार्गाची अवस्था अतिशय खराब झाल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. जनतेची ही मागणी शासनापर्यंत पोहोचवून निधी मंजूर करण्यात यश आले असून लवकरच कामाला सुरुवात होईल. यातून रस्ता मजबुतीकरणासह रुंदीकरण, आवश्यक पूल व सुरक्षा सुविधांची उभारणी करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.


ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## विधानपरिषदेच्या निवडणुकीत महायुतीचे वर्चस्व

नुकत्याच पार पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेमधून निवडूण देण्याच्या लोकप्रतिनिधीत महायुतीचे वर्चस्व तर विरोधी महाआघाडीला मोठा धक्का बसला आहे. यामागील कारणांचा शोध घेणे हे विरोधकांचे काम आहे. विरोधकांनी केवळ सरकार टिका करण्यापेक्षा जनतेच्या प्रश्नाची सोडवणुक केली पाहिजे ती केली नाही. लातूर, बीड व धाराशिवमधून भाजापाचे बसवराज पाटील मुरूमकर यांचा मोठा विजय झाला तर काँग्रेसला मोठा पराभव स्विकारावा लागला. वास्तविक विरोधकामध्ये काँग्रेसचे वर्चस्व आहे व होते. नंतर महायुतीने अनेक स्वराज्य संस्था ताब्यात घेतल्या. उदा. घ्यायचे झाले तर लातूरला काँग्रेसचा बाले किल्ला समजला जातो. त्यात महानगरपालिका काँग्रेसच्या ताब्यात तर जिल्हा परिषद महायुतीकडे आहे. राज्यात मताची आकडेवारीत महायुतीचे पारडे जड दिसून येते. गेल्या पाच-सहा वर्षापासून काँग्रेसचा घसरता आलेख पाहाता चिंताजन्य आहे. यातून मार्ग काढला जात नाही. लातूर हा माजी मुख्यमंत्री दिवंगत विलासराव देशमुख यांनी केलेल्या विकासाकडे पावुन जनता काँग्रेसकडे आजही वळते. काँग्रेसला महानगरपालिकेत मोठे यश मिळविण्यात भाजपाचे प्रांतीय अध्यक्ष कारणीभुत ठरल्याचे बोलले जाते होते. त्यांनी लातूरात येवून विकासनेते विलासराव देशमुख यांच्या बाबत वक्तव्य केले नसते तर भाजपाला मोठे यश मिळाले असते. प्रदेशाध्यकांच्या बोलण्यामुळे अनेक भाजपाच्या उमेदवारास पराभव पत्कारावा ही वस्तूस्थिती जाणून घेतली पाहिजे. या निवडणुक मतदार हा स्थानिक स्वराज्य संस्थेतील सदस्य असतात. त्यामुळे ज्यावेळी निवडणुक जाहिर झाली त्याच वेळी मताचा आकडेवारी पाहाता बसवराज पाटलांचा विजय निश्चित समजला जात होता. केवळ औपचारिकता उरली होती. तसे पाहिले तर राज्यात जात फॅक्टर मोठ्या प्रमाणात चालतो. त्याचाही लाभ बसवराज पाटलांना झाला असेल. मुळात बसवराज पाटील हे धाराशिव जिल्ह्यातील उमरगा तालुक्यतील मुरूम गावाचे आहेत. ते माजी मंत्री असून त्यांनी औसा मतदार संघातून उमेदवारी जिंकली होती. तसे दिवगंत माजी केंद्रियमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांचे मानसपुत्रही समजतात. कमी बोलणे व आपल्यापुरते राजकारण खेळणे हा त्यांचा स्वभाव आहे. घराणाच राजकारणी आहे. असे असले तरी मुरूमकर यांचा विजय भाजपासाठी चांगला आहे. उद्या चालून ते औसा मतदार संघातून विधानसभेची उमेदवारी मागणार नाहीत. नसता विद्यमान आमदार अभिमन्यु पवार यांची डोकेदुखी वाढली असती. पुर्वी मुरुमकर काँग्रेसमधून निवडणुक लढवत होते. भाजपात प्रवेश केल्यावर औसाविधानसभा मतदार संघातून उमेदवारी मिळविणे आवघड नव्हते. मुरूमकरांचा समाज या भागात मोठा आहे. ही डोकेदुखी होती. ते विधानपरिषदेवर गेल्यावर अभिमन्यू पवार यांची डोकेदुखी जवळपास संपली ही भाजपासाठी जमेची बाजू आहे. आता मंत्रीपदाची वर्णी कोणाची लागेल तर यात मोठी स्पर्धा दिसून येणार आहे. एकीकडे निलंगेकर व पवार यांच्यात रस्सीखेच आहे. काही मतदार संघाचा भाग निलंगा तालुक्यात समावला आहे. एकंदरीत रचना मोठी विचित्र आहे. त्यामुळे वरवर का होईल सख्य ठेवावे लागते. आता काँग्रेसला मोठा फटका बसला आहे. लातूर ग्रामीण मतदार संघात आप्पाचे काम जोरात चालू आहे. साखर कारखान्याची उभारणी बरोबर प्रत्येक गावात लक्ष दिले जात आहे. कोणतेही संकट आल्यास रमेशअप्पा धावुन जात आहेत. घर जळालेतर तातडीने संसरोपयोगी साहित्य दिले जाते. अनेक भजनी मंडळांना भजनाचे साहित्य वाटत केले जाते. आरोग्य सुविधा घरचीच असल्याने त्याही मतदारसंघात तातडीने पुरविल्या जात आहेत. त्यामुळे जनतेला हवे ते आप्पाकडून मिळत आहे. त्यामुळे आगामी काळात देशमुखांना एक प्रकारचे आव्हान आहे हे लक्षात घेवुन काँग्रेसने वाटचाल केली पाहिजे. काँग्रेस जिल्ह्यात असणे आवश्यक आहे मात्र ती लातूरपुरती दिसून येते. लातूर जिल्ह्यात विधानसभेचे तीन आमदार भाजपाचे, दोन अजित पवार च्या राष्ट्रवादीचे तर एकमेव लातूर विधानसभा केवळ देशमुख परिवारावरील प्रेमामुळे निवडूण आले व येतात पक्षामुळे नाही ही बाब लक्षात घेतली पाहिजे. एक काळ होता तो लोप पावत आहे. त्यामुळे विरोधकांनी सावध झाले पाहिजे तर सत्ताधाऱ्यांनी माजल्यासारखे वागू नये. नसता हे लातूर आले हे लक्षात घेतले पाहिजे. सतराच्या सतरा जागा महायुतीस मिळविण्यात यश आले एक जागेवर महायुतीचा बंडखोर उमेदवार विजयी झाला म्हणजे जवळपास सर्वच जागा स्थानिक स्वराज्य संस्थेच्यामतदार संघातून सत्ताधाऱ्यास जिंकता आल्या. यामुळे आगामी काळ हा महायुतीसाठी लाभदायक तर काँग्रेससाठी कठीण असणार आहे हे उघड आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेत ज्या पक्षाची चलती आहे त्यांना यश आगामी काळात मिळविता येवू शकेल. असे साधे गणित आहे. मुळात आपल्या राज्यात तीन पक्षाचे सरकार आहे. विरोधकही तीन आहे. या तिघांची गोळाबेरीज केली तर विरोधकांची स्थिती अतिषय बिकट आहे हे लक्षात येते. त्यात महायुतीला मोठे यश मिळत असताना उद्धव ठाकरे यांच्यापक्षातील सहा खासदार एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत दाखल झाले. याचा अर्थ एकनाथ शिंदे दिल्लीत दोन नंबरचा पक्ष समजला जाणार आहे. वजन शिंदे गटाचे वाढणार आहे. तसे पाहिले तर आलिकडे केंद्रिय गृह मंत्री अमित शहा व एकनाथ शिंदे यांची जवळीकता वाढली आहे. अशा स्थितीत केंद्रात एकनाथ शिंदे यांच्या गटास एक कॅबिनेट मुलास व एक राज्यमंत्री ओमराजे निंबाळकर यांच्या रूपात मिळणार आहे अशी दाट शक्यता आहे. आगामी काळात आता निवडणुका मोठ्या नाहीत आता थेट विधानसभा व लोकसभेच्या निवडणुका होणार असल्याने याकडेच लक्ष राहणार आहे. यात महायुतीला सर्वाधिक जागा मिळण्याचा प्रयत्न राहाणार आहे. विधानपरिषदेचा निकाल पाहाता महायुतीला चांगले दिवस येणार आहेत. यामागील कारण हे तसे आहे, स्थानिक स्वराज्य संस्थेशी सर्वसामान्यांचा सहभाग असतो. जवळीकता असते. याचा लाभ महायुतीस होणार आहे. आता जवळपास विरोधक नावालाच दिसून येणार आहेत. लोकशाहीत सत्ताधाऱ्यापेक्षा विरोधकांना अधिक महत्त्व असते. विरोधक जागृत असला पाहिजे तरच लोकशाही वृद्धींगत होते. तसे मात्र दिसून येत नाही. कारण विरोधक जनतेपासून दूर जात आहेत, याचा फायदा सत्ताधाऱ्यास आपोआप मिळत आहे. एक बाब लक्षात ठेवली पाहिजे की, सत्ताधारी जे हवेत असता कामा नये. ते जमीनवर असले पाहिजे. जनतेशी नाते जोडणारे असले पाहिजे. ग्रामीण भाषेत माजलेले होवू नये. यापुढे महायुतीस चांगले दिवस येणार आहेत हे लक्षात ठेवून चालले पाहिजे.

# २०२६ मध्ये जगातील सर्वांत सुरक्षित देश कोणते? भारत कितव्या स्थानावर?



आजच्या काळात परदेशात प्रवास करण्यापूर्वी बहुतेक लोक सुरक्षिततेला सर्वाधिक महत्त्व देतात. मग तो एकट्याने केलेला प्रवास असो, कुटुंबासोबतची सुट्टी असो किंवा व्यावसायिक दौरा असो, प्रत्येकाला सुरक्षित आणि शांत वातावरण असलेल्या देशांना भेट द्यायची इच्छा असते. त्यामुळे जगातील सर्वांत सुरक्षित देश कोणते आणि भारत या यादीत कुठे आहे, याबद्दल अनेकांना उत्सुकता असते.

दरवर्षी 'इन्स्टिट्यूट फॉर इकॉनॉमिक्स अँड पीस' (खएझ) या संस्थेकडून 'ग्लोबल पीस इंडेक्स' म्हणजेच जागतिक शांतता निर्देशांक प्रसिद्ध केला जातो. या अहवालामध्ये जगातील देशांची सुरक्षितता, राजकीय स्थिरता, गुन्हेगारीचे प्रमाण, अंतर्गत संघर्ष, दहशतवादाचा धोका आणि लष्करी परिस्थिती यांसारख्या विविध निकषांच्या आधारे क्रमवारी निश्चित केली जाते.

२०२६ च्या अहवालानुसार, जगभरातील शांततेमध्ये सलग १२ व्या वर्षी घट झाल्याचे समोर आले आहे. अनेक देशांमध्ये युद्धजन्य परिस्थिती, सीमावाद आणि अंतर्गत संघर्ष वाढल्यामुळे जागतिक शांततेवर परिणाम झाला आहे. मात्र, या आव्हानात्मक परिस्थितीतही काही देशांनी आपले अव्वल स्थान कायम राखले आहे.

या यादीत आइसलँडने पुन्हा एकदा पहिला क्रमांक पटकावला आहे. विशेष म्हणजे सलग १९ व्या वर्षी आइसलँड जगातील सर्वांत सुरक्षित आणि शांत देश ठरला आहे. कमी गुन्हेगारी, राजकीय स्थैर्य आणि शांत जीवनशैली ही त्यामागची प्रमुख कारणे आहेत.

दुसऱ्या स्थानावर न्यूझीलंड आहे. सुंदर नैसर्गिक वातावरण, सुरक्षित सार्वजनिक व्यवस्था आणि उच्च जीवनमानामुळे हा देश पर्यटकांचा आवडता ठरतो. तिसऱ्या क्रमांकावर स्वित्झर्लंड आहे. स्वच्छता, उत्कृष्ट प्रशासन, सुरक्षितता आणि तटस्थ परराष्ट्र धोरणामुळे या देशाला विशेष ओळख मिळाली आहे. यानंतर स्लोव्हेनिया आणि आयर्लंड या देशांचा क्रमांक लागतो. हे दोन्ही देश कमी गुन्हेगारी आणि राजकीय स्थैर्यासाठी प्रसिद्ध आहेत.

ऑस्ट्रिया आणि पोर्तुगाल हे देशही सुरक्षिततेच्या बाबतीत आघाडीवर आहेत. सार्वजनिक सुरक्षा, सामाजिक स्थैर्य आणि शांत जीवनशैलीमुळे हे देश जगभरातील पर्यटकांना आकर्षित करतात.

आशियातील सिंगापूरनेही टॉप १० मध्ये स्थान मिळवलं आहे. कठोर कायदे, उत्कृष्ट वाहतूक व्यवस्था आणि शिस्तबद्ध प्रशासनामुळे सिंगापूर हा आशियातील सर्वांत सुरक्षित देशांपैकी एक मानला जातो.


फिनलंड आणि जपान यांनीदेखील टॉप १० मध्ये स्थान मिळवलं आहे. विशेष म्हणजे जपानने यावर्षी तीन स्थानांची झेप घेत आपली कामगिरी सुधारली आहे.

दरम्यान, भारताच्या क्रमवारीत मात्र घसरण झाली आहे. २०२६ च्या ग्लोबल पीस इंडेक्समध्ये १६३ देशांच्या यादीत भारत १२७ व्या स्थानावर पोहोचला आहे. गेल्या वर्षी म्हणजे २०२५ मध्ये भारत ११५ व्या स्थानावर होता. म्हणजेच भारत १२ स्थानांनी खाली घसरला आहे. अहवालानुसार, सीमावर्ती भागातील तणाव, अंतर्गत संघर्ष आणि काही सुरक्षा विषयक आव्हाने ही भारताच्या क्रमवारीतील घसरणीची प्रमुख कारणे आहेत.

दुसरीकडे, रशिया, सुदान, काँगो, युक्रेन आणि इस्रायल हे देश जगातील सर्वांत कमी शांतता असलेल्या देशांच्या यादीत समाविष्ट झाले आहेत. या देशांमध्ये सुरू असलेले संघर्ष आणि अस्थिरता याचा त्यांच्या क्रमवारीवर मोठा परिणाम झाला आहे.

एकंदरीत, सुरक्षित आणि शांत देशांमध्ये प्रवास करण्याचा विचार करणाऱ्यांसाठी ही यादी उपयुक्त ठरू शकते. मात्र, कोणत्याही देशात प्रवास करण्यापूर्वी त्या ठिकाणची सद्यस्थिती, सरकारी प्रवास सूचना आणि स्थानिक नियम यांची माहिती घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

# वजन कमी करायचंय? अक्षय कुमारने सांगितला सर्वात सोपा फॉर्म्युला...



बॉलिवूड अभिनेता अक्षय कुमार हा केवळ आपल्या चित्रपटांमुळेच नव्हे, तर तंदुरुस्त जीवनशैली आणि फिटनेससाठीही ओळखला जातो. वयाच्या ५८ व्या वर्षीही त्याची ऊर्जा, चपळता आणि फिटनेस पाहून अनेक जण आश्चर्यचकित होतात. नुकतंच आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त अक्षय कुमारने पुन्हा एकदा आरोग्य आणि वजन नियंत्रणाबाबत महत्त्वाचा संदेश दिला आहे.

योग दिनाच्या निमित्ताने माध्यमांशी संवाद साधताना अक्षय म्हणाला की, अनेक लोक त्याच्याकडे वजन कमी करण्यासाठी सल्ला मागतात. व्यायाम, डाएट आणि विविध उपाय करूनही वजन कमी होत नसल्याची तक्रार अनेक जण करत असतात. मात्र, त्यावर त्याने अतिशय सोपा उपाय सुचवला आहे.

अक्षय कुमारच्या मते, संध्याकाळचे जेवण वेळेत करणे ही आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाची सवय आहे. तो म्हणाला, जर तुम्ही संध्याकाळी ६ ते ६.३० वाजेपर्यंत तुमचे जेवण पूर्ण केले, तर तुमच्या आरोग्यात मोठा सकारात्मक बदल दिसू शकतो. शरीर अधिक सक्रिय राहते, पचनक्रिया सुधारते आणि वजन नियंत्रणात ठेवणे सोपे जाते.

त्याच्या मते, जेवण आणि झोप यामध्ये पुरेसा वेळ असणे शरीरासाठी फायदेशीर ठरते. त्यामुळे अतिरिक्त कॅलरी साठण्याची शक्यता कमी होते आणि शरीराला अन्न पचवण्यासाठी पुरेसा वेळ मिळतो.

**रात्री उशिरा जेवून वजन कसे कमी होणार?**

यावेळी अक्षयने रात्री उशिरा जेवणाऱ्या लोकांबद्दलही आश्चर्य व्यक्त केले. तो म्हणाला, काही लोक रात्री १० किंवा साडेदहा वाजता जेवतात आणि नंतर वजन कमी होत नसल्याची तक्रार करतात. असे केल्याने शरीरावर अतिरिक्त ताण येतो. वजन कमी करण्यासाठी सर्वात आधी जेवणाची वेळ सुधारणे आवश्यक आहे.

**शिस्तबद्ध जीवनशैलीमुळे मिळते फिटनेसची साथ**

अक्षय कुमार अनेक वर्षांपासून नियमित दिनचर्येचे पालन करतो. तो पहाटे लवकर उठतो, नियमित व्यायाम करतो आणि वेळेवर आहार घेतो. फिट राहण्यासाठी महागडे सप्लिमेंट्स किंवा अत्याधुनिक उपायांपेक्षा चांगल्या सवयी आणि शिस्तबद्ध जीवनशैली अधिक महत्त्वाची असल्याचे तो नेहमी सांगत असतो. याच सवयींमुळे आजही तो स्वतःपेक्षा कमी वयाच्या कलाकारांना फिटनेसच्या बाबतीत कडवी स्पर्धा देताना दिसतो. त्याचा फिटनेस अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी मानला जातो.

**अक्षय कुमारचा वर्कफ्रंट**

दरम्यान, कामाच्या आघाडीवर अक्षय कुमार नुकताच भूत बंगला या चित्रपटात झळकला. या चित्रपटाद्वारे त्याने दिग्दर्शक प्रियदर्शन यांच्यासोबत तब्बल १४ वर्षांनंतर काम केले. या जोडीने यापूर्वी बॉलिवूडला अनेक गाजलेले विनोदी चित्रपट दिले आहेत.

# रात्री वारंवार जाग येतेय?

आजच्या धावपळीच्या आणि तणावपूर्ण जीवनशैलीमुळे अनेक लोकांना झोपेच्या समस्यांना सामोरं जावं लागत आहे. रात्री उशिरापर्यंत जागं राहणं, सतत मोबाईल वापरणं, अनियमित दिनचर्या आणि वाढलेला ताण यामुळे चांगली झोप मिळणं कठीण झालं आहे. लहान मुलांपासून तरुण, विद्यार्थी, नोकरदार आणि गृहिणींपर्यंत अनेक जण अनिद्रेच्या समस्येने त्रस्त आहेत.

रात्री नीट झोप न झाल्यास दुसऱ्या दिवशी सतत थकवा जाणवतो, कामात लक्ष लागत नाही आणि चिडचिड वाढते. दीर्घकाळ झोपेचा अभाव राहिल्यास शरीरावर त्याचे गंभीर परिणामही होऊ शकतात. हार्मोन्समध्ये असंतुलन निर्माण होणं, रोगप्रतिकारक शक्ती कमी होणं आणि मानसिक आरोग्यावर परिणाम होणं अशा समस्या उद्भवू शकतात. तज्ज्ञांच्या मते, आपल्या काही रोजच्या सवयी यासाठी कारणीभूत असतात. या सवयी वेळेवर बदलल्यास झोपेची गुणवत्ता सुधारू शकते.

सतत तणावाखाली राहणाऱ्या लोकांना झोपेच्या समस्या अधिक जाणवतात. कामाचा ताण, अभ्यासाचा दबाव, आर्थिक चिंता किंवा वैयक्तिक समस्या यामुळे मन शांत राहत नाही. परिणामी, झोप येण्यास उशीर होतो किंवा रात्री वारंवार जाग येते.

अशावेळी ध्यानधारणा, श्वसनाचे व्यायाम आणि स्वतःसाठी काही शांत वेळ काढणं फायदेशीर ठरू शकतं. झोपण्यापूर्वी मोबाईल, टीव्ही आणि इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणांपासून दूर राहिल्यास मन शांत होतं आणि झोप चांगली लागते.

# तुम्हीही मनसोक्त मनुके खाताय? तर सावध व्हा...



मनुका हे आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर ड्रायफ्रूट मानले जाते. यात लोह, फायबर, पोटॅशियम आणि अँटिऑक्सिडंट्ससारखे अनेक महत्त्वाचे पोषक घटक असतात. त्यामुळे अनेकजण रोजच्या आहारात मनुकांचा समावेश करतात. मात्र, आरोग्य तज्ज्ञांच्या मते, बहुतेक लोक मनुका खाण्याची एक मोठी चूक करतात. त्यामुळे त्याचे अपेक्षित फायदे मिळत नाहीत आणि काही वेळा आरोग्यावर विपरीत परिणामही होऊ शकतो. अनेक लोक मनुका थेट कोरड्या स्वरूपात आणि जास्त प्रमाणात खातात. हीच सर्वात सामान्य चूक असल्याचं तज्ज्ञ सांगतात. योग्य पद्धतीने मनुकांचं सेवन केल्यास त्याचे अनेक फायदे मिळू शकतात. त्यामुळे मनुका खाण्याची योग्य पद्धत जाणून घेणं महत्त्वाचं आहे.

तज्ज्ञांच्या मते, मनुका थेट खाण्याऐवजी त्या रात्रभर पाण्यात भिजत ठेवून खाल्ल्या तर अधिक फायदेशीर ठरतात. भिजवल्यानंतर त्यातील पोषक तत्त्वं अधिक सक्रिय होतात आणि शरीर त्यांचं शोषण अधिक चांगल्या प्रकारे करू शकतं. त्याचबरोबर त्या पचायलाही हलक्या होतात.

मनुका भिजवून खाल्ल्याने पचनसंस्था सुधारण्यास मदत होते. शरीराला ऊर्जा मिळते आणि लोहाची कमतरता भरून काढण्यासही मदत होऊ शकते. त्यामुळे अनेक पोषणतज्ज्ञ सकाळी रिकाम्या पोटी भिजवलेल्या मनुका खाण्याचा सल्ला देतात.मात्र, मनुका किती खाव्यात याकडेही लक्ष देणं गरजेचं आहे. अनेकजण त्या आरोग्यासाठी चांगल्या आहेत म्हणून दररोज मूठभर किंवा त्यापेक्षा जास्त प्रमाणात खातात. पण हे चुकीचं ठरू शकतं. मनुकांमध्ये नैसर्गिक साखर आणि कॅलरीजचं प्रमाण जास्त असतं. त्यामुळे त्याचं अतिसेवन केल्यास वजन वाढण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. तसेच रक्तातील साखरेच्या पातळीवरही त्याचा परिणाम होऊ शकतो.

तज्ज्ञांच्या मते, दररोज सकाळी रिकाम्या पोटी ८ ते १० भिजवलेल्या मनुकांचं सेवन करणं पुरेसं मानलं जातं. हे प्रमाण बहुतेक लोकांसाठी सुरक्षित आणि फायदेशीर ठरू शकतं. विशेषतः ज्यांना रक्तातील लोहाची कमतरता आहे, वारंवार थकवा जाणवतो किंवा पचनाच्या समस्या आहेत, त्यांच्यासाठी भिजवलेल्या मनुका फायदेशीर ठरू शकतात.

मात्र, प्रत्येकाची शारीरिक स्थिती वेगळी असते. त्यामुळे काही लोकांनी विशेष काळजी घेणं आवश्यक आहे. जर तुम्हाला मधुमेह, लठ्ठपणा किंवा कोणत्याही प्रकारची अन्नाची ॲलर्जी असेल, तर मनुका नियमित आहारात समाविष्ट करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

कोणताही पदार्थ आरोग्यासाठी फायदेशीर असला तरी तो योग्य प्रमाणात आणि योग्य पद्धतीने खाणं तितकंच महत्त्वाचं असतं. मनुकांच्या बाबतीतही हेच लागू होतं. योग्य प्रमाणात आणि भिजवून खाल्ल्यास त्याचे अनेक फायदे मिळू शकतात. मात्र, चुकीच्या पद्धतीने किंवा अतिप्रमाणात सेवन केल्यास त्याचे दुष्परिणामही दिसू शकतात. म्हणूनच, पुढच्या वेळी मनुका खाताना त्या कशा खायच्या आणि किती प्रमाणात खायच्या याची नक्की काळजी घ्या.

## जेवणात तिखट जास्त पडलंय? या ४ सोप्या ट्रिक्स काही मिनिटांत बदलतील चव

स्वयंपाक करताना कधीकधी हात चुकतो आणि भाजी, आमटी, सूप किंवा रस्स्यात मिरची जास्त पडते. त्यामुळे मेहनतीने बनवलेला पदार्थ इतका तिखट होतो की तो खाणंही कठीण वाटू लागतं. अशावेळी अनेकजण तो पदार्थ फेकून देण्याचा विचार करतात. मात्र, काही सोप्या किचन ट्रिक्स वापरून हा तिखटपणा सहज कमी करता येतो आणि पदार्थाची चवही कायम ठेवता येते.

फूड एक्स्पर्ट्स आणि व्यावसायिक शेफदेखील पदार्थातील तिखटपणा कमी करण्यासाठी काही खास उपाय वापरतात. हे उपाय केवळ तिखटपणा कमी करत नाहीत, तर पदार्थाची मूळ चवही टिकवून ठेवतात.

जर तुमच्याही स्वयंपाकात अनेकदा तिखट जास्त पडत असेल, तर हे ५ सोपे उपाय नक्की उपयोगी पडतील.

**१. पदार्थाचं प्रमाण वाढवा:**

तिखट कमी करण्याचा सर्वात सोपा उपाय म्हणजे त्या पदार्थाचं प्रमाण वाढवणं. उदाहरणार्थ, आमटी जास्त तिखट झाली असेल तर त्यात आणखी थोडी डाळ आणि पाणी घाला. भाजीमध्ये अतिरिक्त भाज्या, बटाटे किंवा इतर साहित्य मिसळा. यामुळे तिखटपणा संपूर्ण पदार्थात पसरतो आणि त्याची तीव्रता कमी होते. यामुळे मिरचीचं प्रमाण तेवढंच राहतं, पण एकूण पदार्थ वाढल्यामुळे तिखटपणा कमी जाणवतो.

**२. लिंबाचा रस किंवा आंबट पदार्थ वापरा**

आंबट पदार्थ चवीचा समतोल राखण्यास मदत करतात. लिंबाचा रस, व्हिनेगर किंवा टोमॅटो यांसारख्या पदार्थांमुळे तिखटपणा कमी जाणवतो. करीमध्ये थोडासा लिंबाचा रस घाला, सूपमध्ये काही थेंब व्हिनेगर टाका किंवा टोमॅटो प्युरी वापरा. यामुळे पदार्थाला ताजेपणा येतो आणि मिरचीची तीव्रता कमी होते.

**३. थोडासा गोडवा वाढवा**

काही पदार्थांमध्ये थोडीशी साखर, गूळ किंवा मध वापरल्याने तिखटपणा कमी होण्यास मदत होते. मात्र, त्याचं प्रमाण खूप कमी ठेवा, अन्यथा पदार्थ गोड लागण्याची शक्यता असते. अर्धा चमचा साखर, थोडासा मध किंवा गूळ घालणं पुरेसं असतं. हा उपाय विशेषतः टोमॅटोवर आधारित भाजी, करी किंवा सॉसमध्ये खूप प्रभावी ठरतो.

**४. दही, दूध किंवा क्रीम वापरा**

तिखटपणा कमी करण्याचा हा सर्वात लोकप्रिय उपाय मानला जातो. मिरचीमध्ये असलेलं 'कॅप्सेसिन' हे तिखटपणा निर्माण करणारे घटक दूधातील फॅट आणि प्रोटीनमुळे निष्प्रभ होण्यास मदत होते. त्यासाठी दही, दूध, क्रीम, पनीर किंवा नारळाचं दूध वापरता येतं. जर जेवताना पदार्थ खूप तिखट वाटत असेल, तर त्यासोबत दही किंवा रायता खाल्ल्यास लगेच आराम मिळू शकतो. तिखट जास्त पडल्यामुळे पदार्थ फेकून देण्याची गरज नाही. काही साध्या आणि घरच्या उपायांच्या मदतीने तुम्ही पदार्थाची चव पुन्हा संतुलित करू शकता. पुढच्या वेळी स्वयंपाकात तिखट जास्त झालं, तर या सोप्या ट्रिक्स नक्की वापरून पाहा.

# खाशाबा जाधव पुरस्काराने ऑलिम्पिकपटू बंडा पाटील गौरवित




**कोल्हापूर/प्रतिनिधी::** ऑलिम्पिक दिनानिमित्त पुण्यातील ध्रुवतारा फाऊंडेशनकडून दिला जाणारा मानाचा चौथा खाशाबा जाधव पुरस्काराने ऑलिम्पिकपटू बंडा पाटील यांचा गौरव करण्यात करण्यात आला . देशाचे भूषण खाशाबा जाधव यांना पदम्विभूषण तर मला शिवछत्रपती पुरस्कार मिळाला पाहिजे अशी अपेक्षा बंडा पाटील यांनी व्यक्त केली.

कोल्हापूरातील ऐतिहासिक जिल्हा परिषद संचालित मेन राजाराम हायस्कूल सभागृहात क्रीडा उपसंचालक सुहास पाटील यांच्या हस्ते बंडा पाटील यांना शाल. श्रीफळ, सन्मानचिन्ह व रोख हजार रूपयांने सन्मान करण्यात आले. याप्रसंगी उद्योजक मनिष झंवर, रोहित मुसळे, क्रीडा अधिकारी अरूण पाटील, प्राचार्य गजानन खाडे, लेखक संजय दुधाणे , वस्ताद बाबा महाडिक, शहाजी सूर्यवंशी आदी मान्यवर उपस्थित होते. राष्ट्रीय खो-खो खेळाडू सानिका चाफे, अमृता पाटील, श्रावणी पाटील, कुस्तीगीर पृथ्वीराज मोहिते, क्रीडा प्रशिक्षक भीमा भांदिगरे यांचाही या विशेष सत्कार करण्यात आला.

कोल्हापूरातील ऐतिहासिक मेन राजाराम हायस्कूलमध्ये १९५२ काळात राजाराम महाविद्यालय भरायचे. या महाविद्यालाच्या मुख्य सभागृहात खाशाबांचा कोल्हापरकरांनी नागरी सत्कार केला होता. याच ऐतिहासिक सभागृहात खाशाबा जाधव पुरस्कार समारंभ ऑलिम्पिक दिनीच्या निमित्ताने रंगला. यावेळी कोल्हापूरातील खाशाबांच्या आठवणींना उजाळा संजय दुधाणे देत नव्या पिढीतही खाशाबा घडावा अशी अपेक्षा टाळ्यांच्या गजरात व्यक्त केली.

सत्काराला उत्तर देताना बंडा पाटील म्हणाले की आमचे आदर्श खाशाबांना नावाने मला पुरस्कार मिळाला हे माझे परमभाग्य आहे. मलाही ऑलिम्पिकपटू असताना शासनाने शिवछत्रपती पुरस्कार अजून दिला नाही. तो मिळावी हीच अपेक्षा आहे. क्रीडा उपसंचालक सुहास पाटील आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले की, कोल्हापूरातील खेळाडूंना अत्याधुनिक सुविधा देण्यासाठी आम्ही कटिबध्द आहे. खाशाबांप्रमाणे अनेक क्रीडापटू घडण्यासाठी असे उपक्रम प्रेरणादायी आहे.

क्रीडा क्षेत्रातील जेष्ठ व निवोदित चार पिढींच्या उपस्थितीत खाशाबा जाधव पुरस्कार स्मरणीय झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. सुषमा पाटील यांनी केले तर आभार आरोग्यसेवक राजेंद्र मकोटे यांनी मानले.

# प्रकाशकांनी ३० जून पर्यंत वार्षिक विवरणपत्र दाखल करावे

## विवरणपत्र दाखल न केल्यास दहा हजारांचा दंड

**लातूर/प्रतिनिधी:** प्रेस आणि नियतकालिक नोंदणी अधिनियम, २०२३ अंतर्गत नोंदणीकृत प्रत्येक नियतकालिकाने आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षित वार्षिक विवरणपत्र प्रेस सेवा पोर्टल वर ऑनलाइन सादर करणे बंधनकारक आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ चे विवरणपत्र सादर न करणाऱ्या प्रकाशकांना ३० जून २०२६ पर्यंतची अखेरची संधी देण्यात आली आहे. यानंतर कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नसल्याचे भारत सरकारच्या प्रेस रजिस्टर जनरल, नवी दिल्ली यांनी सूचनांद्वारे कळविले आहे.

प्रेस आणि नियतकालिक नोंदणी अधिनियम, २०२३ मधील कलम १४(१)(ब) व १४(३) नुसार, वार्षिक विवरणपत्र निर्धारित मुदतीत न भरल्यास संबंधित प्रकाशकावर दंड आकारण्याची तरतूद आहे. पहिल्या चुकीसाठी किमान दहा हजार रुपयांचा दंड आकारला जाईल. त्यानंतरच्या प्रत्येक चुकीसाठी दंडाची रक्कम मागील दंडाच्या दुप्पट असेल. मात्र, एकूण दंडाची कमाल मर्यादा दोन लाख रुपये निश्चित करण्यात आली असल्याचे प्रेस रजिस्टार जनरल, नवी दिल्ली यांनी दिलेल्या सूचनांमध्ये नमूद केले आहे.

आर्थिक वर्ष २०२४-२५ चे वार्षिक विवरणपत्र अद्याप सादर न केलेल्या प्रकाशकांनी ३० जून २०२६ पर्यंत ऑनलाइन दाखल करावे. या मुदतीनंतर विवरणपत्र सादर न केल्यास अधिनियमातील तरतुदीनुसार दहा हजार रुपयांचा दंड आकारण्यात येईल,असेही प्रेस रजिस्टर जनरल, नवी दिल्ली यांनी सूचनांमध्ये नमूद केले आहे.

## कृषी पुरस्कार सोहळ्याचे राज्यपालांना निमंत्रण – कृषि मंत्री दत्तात्रय भरणे

**मुंबई/ प्रतिनिधी:** हरित क्रांतीचे प्रणेते आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व.वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त साजऱ्या होणाऱ्या कृषी दिनाचे औचित्य साधून बुधवार, १ जुलै २०२६ रोजी मुंबई येथे पुरस्कार सोहळा होणार आहे. २०२३ व २०२४ या दोन्ही वर्षांतील राज्यस्तरीय कृषी पुरस्कार विजेत्यांचा सन्मान एकत्रितपणे करण्यात येणार असून, या सोहळ्यास राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांना कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी निमंत्रीत केले आहे. कृषिमंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, महाराष्ट्रातील कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, उत्पादनवाढ, शाश्वत शेती, नाविन्यपुर्ण कल्पना आणि कृषी विकासासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकरी, संस्था व कृषी क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव करण्यासाठी राज्यस्तरीय कृषी पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. राज्यातील प्रगतशील शेतकरी, कृषी संस्था आणि कृषी क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या सर्व घटकांच्या योगदानाचा सन्मान करणे ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. या पुरस्कारांमुळे कृषी क्षेत्रात नवे आदर्श निर्माण होतील आणि इतरांनाही प्रेरणा मिळेल, असा विश्वास आहे असे ते म्हणाले.

# लातूर तालुक्यात मुरुड बु. येथे नवीन अपर तहसीलदार कार्यालय स्थापन करण्याबाबत उपविभागीय अधिकाऱ्यांकडून प्रारुप अधिसूचना प्रसिद्ध

## ७ जुलै पर्यंत हरकती किंवा सूचना सादर करण्याचे आवाहन

**लातूर/ प्रतिनिधी:** लातूर तालुक्यामध्ये नवीन अपर तहसीलदार कार्यालय स्थापन करण्यास मंजुरी मिळाली असून या कार्यालयाचे मुख्यालय आणि कार्यक्षेत्र निश्चित करणारी प्रारूप अधिसूचना आज प्रसिद्ध करण्यात आली आहे. शासनाच्या निर्देशानुसार उपविभागीय अधिकारी रोहिणी नरहे-विरोळे यांनी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या नियमांनुसार ही प्रारूप अधिसूचना जारी केली आहे. यानुसार मुरुड बु. येथील अपर तहसीलदार अधिकारी यांच्याकडे लातूर तहसीलदार यांना महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ किंवा त्या-त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये असलेले सर्व अधिकार व कर्तव्ये त्यांच्याकडून नेमून दिलेल्या क्षेत्रासाठी प्रत्यार्पित करण्याचे योजिले असल्याचे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

या अधिसूचनेनुसार मुरुड बु. येथील ग्रामपंचायत इमारत किंवा ग्रामसेवक क्वार्टर येथे नवीन अपर तहसीलदार कार्यालयाचे मुख्यालय असणार आहे. या नवीन कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात एकूण ३ महसूल मंडळे समाविष्ट करण्यात आली असून यामध्ये मुरुड बु., चिंचोली (ब.) आणि तांदुळजा या मंडळांचा समावेश आहे. या तिन्ही मंडळांतर्गत येणारे एकूण १८ साझे आणि ४३ गावे, वाड्या व तांडे या कार्यालयाच्या अखत्यारीत राहतील. या नवीन रचनेमुळे तहसीलदार लातूर यांचे महसूल संहितेअंतर्गत असलेले सर्व अधिकार व कर्तव्ये आता मुरुडच्या अपर तहसीलदारांकडे त्यांच्या क्षेत्रापुरती प्रत्यार्पित केली जाणार आहेत.

या प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रारूप अधिसूचनेबाबत नागरिकांना काही हरकती किंवा सूचना मांडायच्या असल्यास, त्यांनी दिनांक ७ जुलै २०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत उपविभागीय अधिकारी कार्यालय, मेन रोड, तहसील कार्यालयासमोर, लातूर येथे समक्ष हजर राहून त्या सादर कराव्यात, जेणेकरून प्राप्त झालेल्या हरकती व सूचना पुढील कार्यवाहीसाठी शासनाच्या निदर्शनास आणून दिल्या जातील, असे उपविभागीय अधिकारी रोहिणी नरहे-विरोळे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

# महानगरपालिकेच्या वतीने एकल महिला दिवस संपन्न

## शहरातील एकल महिलांनी मनपा योजनेचा लाभ घ्यावा – मनपाचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी:** शासनाकडून राज्याचे एकल महिला धोरण तयार करण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे यासाठी लातूर शहर महानगरपालिका महिला बालकल्याण समिती व दीनदयाळ अंत्योदय योजना- राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत महापौर जयश्रीताई सोनकांबळे, आयुक्त मानसी मडम, उपमहापौर स्नेहल उटगे, स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले, सभागृह नेते विजयकुमार साबदे , विरोधी पक्ष नेते देविदास काळे व इतर सर्व सन्माननीय सदस्य यांच्या नियोजन व मार्गदर्शनाखाली तसेच उपायुक्त वसुधा फड यांच्या सुचनेनुसार २३ जुन रोजी भालचंद्र ब्लड बँक, लातूर येथे एकल महिला दिवस संपन्न झाला.

या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांचे हस्ते क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमासाठी प्रास्ताविक उपायुक्त वसुधा फड यांनी केले व सभागृह नेते विजयकुमार साबदे , विरोधी पक्ष नेते देविदास काळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, साऊ एकल महिला समितीच्या सविता कुलकर्णी हे उपस्थित राहून महिलांना मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमामध्ये मनपा आरोग्य विभागाच्या वतीने महिलांचे आयुष्यमान कार्ड काढणे , महिलांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

यावेळी उपस्थित महिलांना महिला बचत गट, बँकेकडून अल्प व्याज दराने बचत गटांना व फेरीवाले यांना कर्ज , रमाई घरकुल योजना, प्रधानमंत्री आवास योजना, आयुष्यमान कार्ड, मनपा मालमत्तावर महिलांचे नाव लावणे, तहसील कार्यालयाच्या श्रावणबाळ योजना, निराधार योजना इ. योजनाची माहिती देण्यात आली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समुदाय संघटक विरेंद्र सातपुते, समूह संसाधन व्यक्ती लोमावती मुळे, नीता भालेकर , घटना सोनकांबळे, अनिता पवार, शीतल गोरे, ज्योती सोनकांबळे, सुमन जाधव, संगीता गव्हाणे, सोनाली जाधव , अविनाश बिराजदार यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शहर अभियान व्यवस्थापक लक्ष्मण जाधव यांनी केले ते आभार शहर अभियान व्यवस्थापक नितीन सुरवसे यांनी मानले.

# तरुणांनी स्व-नियंत्रणातून व्यसनापासून दूर राहावे न्यायाधीश व्ही. एन. गिरवलकर



**लातूर/ प्रतिनिधी:** तरुणाई ही कोणत्याही राष्ट्राची खरी संपत्ती असून स्व-नियंत्रणातून तरुणांनी व्यसनापासून दूर राहिले पाहिजे असे प्रतिपादन जिल्हा विधी सेवा प्राधिकरण लातूरचे सचिव न्यायाधीश व्ही. एन. गिरवलकर यांनी केले. महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील आय.क्यू.ए.सी., समाजकार्य विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, लातूर, जिल्हा वकील संघ, लातूर आणि आयुष्यमान व्यसनमुक्ती केंद्र, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अमली पदार्थाच्या गैरवापर आणि अवैध तस्करी विरोधात आंतरराष्ट्रीय दिनानिमित्त आयोजित एका विशेष कार्यक्रमात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर हे होते, तर विचारपीठावर संस्थेचे कार्यकारी संचालक प्रदीप दिंडेगावे, जिल्हा वकील मंडळाचे सचीव ॲड.जी.सी.येरटे, सहसचिव ॲड.एस.आर.धायगुडे, सदस्य ॲड.जी.जे.मिटकरी, उपमुख्य न्याय रक्षक ॲड.जी.जे.मिटकरी, मुख्य मार्गदर्शक ॲड.स्नेहा शिनगारे, डॉ.संजय पाटील, डॉ.जावेद अत्तार, सलीम पठाण, प्राचार्य प्रो.डॉ.सिद्राम डोंगरगे, उपप्राचार्य प्रा.नितीन वाणी आणि संस्था कायदेशीर सल्लागार ॲड.शेखर हविले यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्वरांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

पुढे बोलताना न्यायाधीश व्ही.एन.गिरवलकर म्हणाले की, व्यसनाधीनता हा व्यक्ती, समाज आणि राष्ट्र यांच्यासमोर एक मोठे आव्हान आहे. अमली पदार्थाच्या सेवनातून व्यक्ती कुटुंब व समाज व्यवस्था ही संपूर्णपणे उध्वस्त होताना दिसत आहे अशावेळी तरुणांनी विवेक बाळगून व्यसनाच्या आहारी न जाता व्यसनांवर मात केली पाहिजे. अमली पदार्थांचे होणारे उत्पादन आणि खरेदी-विक्री यावर कायदेशीर बंधने असले तरी हा अवैध व्यापार रोखण्यासाठी तरुणांनी सर्वतोपरी प्रयत्न केले पाहिजे असेही ते म्हणाले. यावेळी बोलताना ॲड.स्नेहा शिनगारे म्हणाल्या की, व्यक्तिगत आरोग्य, समाज व्यवस्था आणि कायद्यासमोर व्यसनाधीनता एक आव्हान म्हणून उभे आहे. तरुणाईत विद्यार्थी ताणतणापासून दूर राहणे, फॅशन आणि मौजमजा याकरिता अमली पदार्थांचे सेवन करतात त्यामुळे वैयक्तिक शरीर, कटुंब व्यवस्था, समाज व्यवस्था आणि राष्ट्र यावरही अमली पदार्थाचे सेवनाचा परिणाम होतो. तरुणांनी व्यसनापासून दूर राहण्याचे धैर्य बाळगले पाहिजे, व्यसनाधीन व्यक्तीचा तिरस्कार करण्यापेक्षा स्नेह, प्रेम आणि समुपदेशनाने त्यात बदल केला पाहिजे त्यामुळे सुदृढ राष्ट्र निर्माण होईल असेही त्या म्हणाल्या. यावेळी बोलताना डॉ. जावेद अत्तार म्हणाले की, मानवी संवेदना भान हरवून सोडणारी कोणतीही गोष्ट म्हणजे अमली पदार्थ होय. देशातील तरुणांनी व्यसनांच्या मागे लागून आपले सामर्थ्य हरवून बसले आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणात तरुण एकलकोंडी होऊन आत्महत्येला प्रवृत्त होत आहेत. व्यसनाधीनता ही एक साखळी असून त्यातून बाहेर पडण्यासाठी समुपदेशन आणि औषध उपचार हे मार्ग आहेत त्यामुळे व्यसनाधीन रुग्णाला वेळीच योग्य सल्ला आणि मार्गदर्शन प्राप्त झाल्यास तो बरा होऊ शकतो असेही ते म्हणाले

अध्यकक्षीय समारोपात सचिव माधवराव पाटील टाकळीकर म्हणाले की, सर्व धर्म आपल्याला आदर्श आचरण सांगतो. निसर्गाने दिलेल्या साधनसंपत्तीचा यथायोग्य वापर करून निसर्गातील ऊर्जा आपण स्वीकारली पाहिजे. एकलकोंडेपणा टाळून चांगल्या व्यक्तीच्या आणि पुस्तकाच्या सानिध्यात आपण राहिले पाहिजे. ताणतणावांना सामोरे जाण्यासाठी आपण दररोज योग साधना केली पाहिजे त्या मार्गातून मन स्थिर राहून अमली पदार्थांच्या सेवनापासून दूर राहते. यासंदर्भात कायदे अनेक आहेत पण या कायद्याची अंमलबजावणी अधिकाधिक कठोर व सुव्यवस्थेत झाल्यास व्यसनाधीनतेवर आळा बसेल असेही ते म्हणाले कार्यक्रमाचे प्रास्ताविकपर मनोगत प्राचार्य प्रो.डॉ.सिद्राम डोंगरगे यांनी केले, सूत्रसंचालन प्रा.किसनाथ कुडके यांनी केले तर आभार डॉ.मनोहर चपळे यांनी मानले.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्य समन्वयक प्रो.डॉ.नल्ला भास्कर रेड्डी, पर्यवेक्षक डॉ. गुणवंत बिरादार, आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ.आनंद शेवाळे, समाजकार्य विभाग प्रमुख प्रो.डॉ. दिनेश मौने, प्रो.डॉ.संजय गवई, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. रत्नाकर बेडगे, प्रो.डॉ.शिवप्रसाद डोंगरे, क्रीडा शिक्षक प्रा.आशिष क्षीरसागर, लेफ्टनंट डॉ. सुजित हांडीबाग, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांच्यासह शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# नेताजी पालकरांच्या पुनर्प्रवेशाच्या ३५० वर्षपूर्ती निमित्त लातूरमध्ये व्याख्यानाचे आयोजन

## वर्षापूर्वी शिवरायांनी दाखवलेला 'घरवापसी' चा मार्ग आज देशासाठी आवश्यक – सच्चिदानंद आहेर

**लातूर/प्रतिनिधी:** नेतोजी पालकर यांच्या हिंदू धर्मातील पुनर्प्रवेशाच्या ऐतिहासिक घटनेला ३५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने कल्चरल स्टडी अँड रिसर्च सेंटर व शहरातील विविध हिंदुत्ववादी संघटनांच्या संयुक्त विद्यमाने लातूर येथे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.



'छत्रपती शिवाजी महाराजांचा धर्म विषयक दृष्टिकोन' या विषयावर शिवशंभू विचार मंच, पुणेचे सच्चिदानंद आहेर यांनी मार्गदर्शन केले. आपल्या भाषणात आहेर यांनी इतिहासाच्या विद्रोपीकरणावर टीका करत अनेक प्रचलित दाव्यांना आव्हान दिले. सध्या देशातील धर्मांतराच्या समस्यांवर शिवरायांची 'घरवापसी' हीच प्रभावी उपाययोजना आहे, असे ते म्हणाले. यावेळी त्यांनी नेतोजी पालकर यांच्या पुनर्प्रवेशाच्या घटनेसह शिवरायांच्या धर्मसंरक्षण व स्वराज्य स्थापनेच्या कार्याचा ऐतिहासिक संदर्भांसह आढावा घेतला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्यात ७० टक्क्यांहून अधिक मुस्लिम सैनिक होते, हा दावा ऐतिहासिक पुराव्यांशी सुसंगत नसल्याचे सांगत त्यांनी महाराजांच्या सेवेत बारा पेक्षा जास्त मुस्लिम व्यक्तींचाच सहभाग नसल्याचा दावा केला. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला ब्राह्मणांनी विरोध केला, या मतालाही समकालीन पुरावे उपलब्ध नसल्याचे त्यांनी नमूद केले. काशीचे विद्वान गागाभट्ट यांच्या हस्ते वैदिक पद्धतीने राज्याभिषेक पार पडल्याचा उल्लेख करत आहेर यांनी शिवकालीन इतिहासातील विविध घटनांवर आपली भूमिका मांडली. मुघल आक्रमणे, मंदिरांवरील हल्ले, हिंदवी स्वराज्याची स्थापना आणि धर्मसंरक्षण यांसंदर्भातील ऐतिहासिक उदाहरणांचाही त्यांनी उल्लेख केला.

कार्यक्रमास ॲड. जोगेंद्रसिंह चव्हाण यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती. इंजि.मनोज सूर्यवंशी यांनी प्रास्ताविकात १९ जून रोजी छत्रपती शिवाजी महाराजांनी नेतोजी पालकर यांचा सनातन हिंदू धर्मात पुनर्प्रवेश घडवून आणल्याच्या ऐतिहासिक घटनेचे महत्त्व विषद केले तसेच या दिनानिमित्त समाजप्रबोधन आणि इतिहास जागृतीसाठी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आल्याचे सांगितले. अध्यक्षीय मनोगत डॉ. व्यंकट कोलपुके यांनी व्यक्त केले. सूत्रसंचालन नामदेव व्यंजने यांनी, तर आभार प्रदर्शनात वीर योद्धा संघटनेचे अध्यक्ष श्रीकांत रांजणकर यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व शिवप्रेमी, नागरिक, आयोजक, आणि उपस्थित मान्यवरांचे आभार मानले. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास व विचार समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संजय कांबळे, लक्ष्मीकांत कुलकर्णी, आनंद अग्रवाल, राजेंद्र बिराजदार, दिलीपचंद चोपडा आदींनी परिश्रम घेतले.

# गतिरोधकावर स्कूटी आदळल्याने महिलेचा मृत्यू; वाहतूक नियमांचे पालन आणि हेल्मेटचा वापर जीवनरक्षक

**लातूर/प्रतिनिधी:** तुळजापूर-औसा मार्गावरील उजणी येथील पुलाजवळ झालेल्या दुचाकी अपघातात एका महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली. या प्रकरणी भादा पोलीस ठाण्यात निष्काळजीपणे वाहन चालविल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि. १८ जून रोजी दुपारी सुमारे ४ वाजण्याच्या सुमारास अंजली गणेश नकाते (रा. मंगळवेढा, जि. सोलापूर) या ज्यूपीटर स्कूटी (क्र. चक २४ उउ ९८७६) वर मागे बसून प्रवास करत होत्या. त्यावेळी चालक सचिन सुग्रीव यादव (रा. चांडेश्वर, ता. जि. लातूर) याने वाहन भरधाव व निष्काळजीपणे चालविल्याने उजणी येथील पुलाजवळील गतिरोधकावर स्कूटी आदळली. या धडकेत अंजली नकाते या दुचाकीवरून खाली पडल्या व त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्यांनी हेल्मेट परिधान केलेले नव्हते. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. त्यांनी हेल्मेटचा वापर केला असता तर त्यांचा जीव वाचू शकला असता.

या घटनेप्रकरणी नागनाथ दगडू बळके यांनी दिलेल्या फिर्यादीवरून भादा पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १२६/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता (इछड) कलम १०६(१), २८१, १२५(अ) व १२५(ब) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस अमलदार कांबळे करीत आहेत.

दुचाकी चालविताना तसेच मागे बसलेल्या व्यक्तीनेही मानांकित हेल्मेटचा वापर करणे अत्यंत आवश्यक आहे. अनेक अपघातांमध्ये डोक्याला गंभीर दुखापत झाल्यामुळे मृत्यू ओढवतात. हेल्मेटचा वापर केल्यास अशा दुखापतींची तीव्रता मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते.तसेच वाहन चालविताना वेगावर नियंत्रण ठेवणे, रस्त्यावरील गतिरोधक, वळणे व पुलांजवळ विशेष काळजी घेणे, वाहतूक नियमांचे पालन करणे आणि सुरक्षित अंतर राखणे ही प्रत्येक वाहनचालकाची जबाबदारी आहे. काही क्षणांचा निष्काळजीपणा संपूर्ण कुटुंबासाठी दुःखद ठरू शकतो. त्यामुळे नागरिकांनी स्वतःच्या व इतरांच्या सुरक्षिततेसाठी वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात येत आहे.

# महेश नवमीच्या शोभायात्रेने जिंकली लातूरकरांची मने!

## लातूर जिल्ह्याच्या विकास – प्रगतीत माहेश्वरी समाजाचे मोठे योगदान : दिलीपराव देशमुख



**लातूर/प्रतिनिधी:** लातूर जिल्हा माहेश्वरी सभेच्या वतीने महेश नवमीचे औचित्य साधून मंगळवारी सायंकाळी काढण्यात आलेल्या भव्य दिव्य शोभायात्रेने लातूरकरांची मने जिंकली. शोभायात्रेच्या शुभारंभ प्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना सहकार महर्षी – माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी लातूर जिल्ह्याच्या विकास आणि प्रगतीत माहेश्वरी समाजाचे मोठे योगदान असल्याचे मत व्यक्त केले.

लातूर जिल्हा माहेश्वरी सभेच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही श्री महेश नवमीचे औचित्य साधून विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवारी शहरातील छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील श्री गौरीशंकर मंदिरापासून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेचा प्रारंभ दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, आबासाहेब पाटील, दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष ललितभाई शहा, सचिव रमेश बियाणी, व्यापारी धर्मशाळेचे अध्यक्ष रमेश राठी, लातूर जिल्हा माहेश्वरी सभेचे अध्यक्ष सीए प्रकाश कासट, हुकूमचंद कलंत्री, धनराज भुतडा, ईश्वरप्रसाद डागा, ईश्वर बाहेती यांसह मान्यवरांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रकाश कासट यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी तीन वर्षांपूर्वी लातूर जिल्हा माहेश्वरी सभेच्या वतीने साजरी केली गेलेली महेश नवमी देशभरात अव्वल ठरल्याचे आवर्जून सांगितले. समाजाचे संगठन मजबूत झाल्यामुळे या सोहळ्यात आता हजारोंच्या संख्येने समाज बांधव – भगिनी स्वयंस्फूर्तीने सहभागी होत आहेत. आपला समाज स्वाभिमानी – कष्टकरी असून लातूरचा ९० टक्के व्यापार माहेश्वरी समाज चालवतो असे सांगून आपल्या समाजाच्या एकूण २७ ट्रस्ट असून ट्रस्टकडे कोणीही स्वतःहून मदत मागायला पुढे येत नाही, एवढा आपला समाज स्वाभिमानी असल्याचे उद्गारही त्यांनी काढले.

यावेळी आपले विचार व्यक्त करताना माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी माहेश्वरी समाज बांधवांना महेश नवमीच्या शुभेच्छा दिल्या. सहिष्णुता, सचोटी, संयम, दानत या सर्व बाबी माहेश्वरी समाजाकडे मुबलक असल्याचे सांगून सातत्याने कार्यमग्न राहणारा हा समाज असल्याचे त्यांनी सांगितले. व्यवसायाची शिस्त कशी पाळावी? हे या समाजाकडून शिकावे असे सांगून माहेश्वरी सभेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाचे त्यांनी कौतुक केले. मार्केट यार्डापासून निघालेल्या या शोभायात्रेत सहभागी झालेल्या माहेश्वरी ढोलताशा पथकाच्या कामगिरीने सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले. या शोभायात्रेचे संयोजक ईश्वर बाहेती, संतोष तोष्णीवाल, गणेश हेड्डा, नंदकिशोर लोया, राहुल लोया, ईश्वर चांडक, दिनेश गिल्डा हे होते. माहेश्वरी समाजातील स्त्री – पुरुष हजारोंच्या संख्येने पारंपरिक वेशभूषेत शोभायात्रेत सहभागी झाले होते. मार्केट यार्डापासून निघालेली ही शोभायात्रा गुल मार्केट, हनुमान चौक, सुभाष चौक, दयाराम रोड मार्गे गोदावरीदेवी लाहोटी कन्या प्रशालेत विसर्जित झाली.



शोभायात्रेतील आकर्षक देखावे सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनीही शोभायात्रा पाहून समाधान व्यक्त केले. गोदावरीदेवी लाहोटी कन्या विद्यालयात ही शोभायात्रा विसर्जित झाल्यानंतर त्याठिकाणी तोष्णीवाल परिवाराच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या स्नेहभोजनाचा लाभ हजारो समाज बांधवांनी घेतला.

# महापारेषणच्या अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालकपदी विक्रम कुमार यांची नियुक्ती



**मुंबई/प्रतिनिधी:** वरिष्ठ सनदी अधिकारी विक्रम कुमार यांनी आज (दि. २३) महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या (महापारेषण) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक पदाचा कार्यभार स्वीकारला. त्यांच्या नियुक्तीमुळे महापारेषणला अनुभवी, दूरदृष्टी असलेले आणि पायाभूत सुविधांच्या विकासात मोलाचा अनुभव असलेले नेतृत्व लाभले आहे.

महाराष्ट्र कॅडरच्या २००४ बॅचचे आयएएस अधिकारी असलेले विक्रम कुमार यांना नागरी प्रशासन, पायाभूत सुविधा विकास, औद्योगिक प्रगती आणि सार्वजनिक प्रशासन क्षेत्रातील दोन दशकांहून अधिकचा अनुभव आहे. महापारेषणमध्ये रुजू होण्यापूर्वी ते मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण येथे अतिरिक्त महानगर आयुक्त-१ म्हणून कार्यरत होते. त्यांनी मार्च २०२४ पासून ही जबाबदारी सांभाळली होती.

बॅचलर ऑफ आर्किटेक्चरचे शिक्षण घेतलेल्या विक्रम कुमार यांनी महाराष्ट्र शासनातील अनेक महत्त्वाच्या पदांवर यशस्वीपणे काम केले आहे. त्यांनी पुणे महानगरपालिकेचे आयुक्त, पुणे महानगर विकास प्राधिकरणचे आयुक्त, महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे सहमुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत.

तसेच त्यांनी छत्रपती संभाजीनगर आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, मीरा-भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त तसेच वाशीम जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणूनही उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे.

महापारेषणचे नवे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक म्हणून विक्रम कुमार यांच्यासमोर ऊर्जा संक्रमण, राज्यातील पारेषण जाळ्याचा विस्तार, अक्षय ऊर्जा प्रकल्पांचे प्रभावी एकत्रीकरण, ग्रीडचे आधुनिकीकरण आणि महाराष्ट्राच्या ऊर्जा पायाभूत सुविधांचे बळकटीकरण ही महत्त्वाची आव्हाने असणार आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली महापारेषण या क्षेत्रांत अधिक वेगाने प्रगती करेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. देशातील आघाडीच्या वीज पारेषण कंपन्यांपैकी एक असलेल्या महापारेषणकडे महाराष्ट्रभर विस्तृत अतिरिक्त उच्चदाब (एक्स्ट्रा) वीज पारेषण यंत्रणा असून राज्याच्या औद्योगिक, कृषी आणि सामाजिक विकासासाठी अखंड व विश्वासार्ह वीजपुरवठा सुनिश्चित करण्यात कंपनीची महत्त्वपूर्ण भूमिका आहे.

महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विक्रम कुमार यांचे स्वागत करत त्यांच्या नेतृत्वाखाली कंपनीच्या विकासाला नवी दिशा मिळेल तसेच कार्यक्षमता, नावीन्य आणि उत्कृष्टतेच्या वाटचालीला अधिक बळ मिळेल, असा विश्वास व्यक्त केला आहे.

# 'नवतेजस्विनी' प्रकल्प जिल्हा सल्लागार समितीची बैठक

## कृषि विभाग, मनरेगाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवावेत

### शासकीय योजनांच्या माध्यमातून महिला बचतगट सक्षमीकरणासाठी प्रयत्न करा -जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड



**लातूर/प्रतिनिधी:** राज्य शासन महिला सक्षमीकरणासाठी विविध योजना राबवीत आहे. यासोबतच विविध शासकीय विभागांच्या योजनांमध्ये महिला बचतगटांनाही प्रोत्साहन देण्यात येत आहे. महिला आर्थिक विकास महामंडळाने (माविम) या विभागांशी समन्वय ठेवून महिला बचतगटांच्या सक्षमीकरणासाठी प्रयत्न करावेत, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी आज येथे दिल्या.

महिला आर्थिक विकास महामंडळाच्या नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्पांतर्गत जिल्हास्तरीय सल्लागार समितीची बैठक जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात झाली. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक संजय इंगळे, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी राजेंद्र कदम, जिल्हा पशुसंवर्धन सहायक आयुक्त डॉ. श्रीधर शिंदे, नाबार्डचे जिल्हा विकास व्यवस्थापक प्रमोद पाटील, कौशल्य विकास सहायक आयुक्त निशांत सूर्यवंशी, जिल्हा ग्रामउद्योग अधिकारी चिंतामणी गुट्टे यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

मनरेगामधून रोपवाटिका निर्मिती, कृषि विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या पोकरा प्रकल्पात समाविष्ट गावांमध्ये अवजारे बँक यासाठी महिला बचतगटांना प्राधान्य देण्यात येते. त्यामुळे महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून संबंधित विभागाशी समन्वय साधून या योजनांचा लाभ महिला बचतगटांना द्यावा. यासोबतच कुक्कुटपालन, शेळीपालन आदी व्यवसाय उभारणीसाठीही बँकेचे सहकार्य उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करावेत, असे जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड म्हणाले.

प्रारंभी महिला आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा समन्वय अधिकारी सोमनाथ लामगुंडे यांनी महामंडळाच्या जिल्ह्यातील कामकाजाची माहिती दिली.

### हर्ष डायग्रोस्टिक सेंटर नळेगाव येथे उद्घाटन संपन्न

**अजगर मजकुरी/नळेगाव :** कार्यक्रमाचे अध्यक्ष डी.बी. लोहारे गुरुजी, उद्घाटक मा.खा.डॉ. शिवाजीराव काळगे हे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून जि.प. सदस्य अमर पाटील , पं.स.सदस्य शिवम देवशेटवार,डॉ.संदीप कवटाळे, डॉ.भालचंद्र पे.के., अजित (बुदरे), डॉ.वळसंगकर, प्रा. सुनिता नवले, अनिल मुळे, डॉ.प्रा.रामलिंग मुळे यांची उपस्थिती होती. सर्व पाहुण्यांचे सत्कार करण्यात आले. आभार डॉ.परीक्षित अनिल मुळे यांनी मानले.




निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र

सितारी विमा सेवा केंद्र

दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.

वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत

जमीरोद्दीन सितारी

चेअरमन क्लक मेंबर CLIA

एजंट भरती चालू आहे.

संपर्क → Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396


### कान उघाडणी..

खाजगीत करायची
नीत कान उघाडणी
सन्मानअसे प्रत्येकां
असो कसा अडाणी
सर्वांसमक्ष अपमान
गोष्ट रे लाजीरवाणी
शब्दांसहव्यामर्यादा
ताब्यात ठेवून वाणी
कायम उपदेश देता
रेवाचा कंटाळवाणी
अवस्था रे दीनवाणी
चारचौघातचं मुद्दाम
का करतो हेटाळणी
कुणाचे लागले अक्ष
आधी करे टेहाळणी
केवळ शब्द फेकीत
निर्माण आणि बाणी
ओळखून असे लोक
कितपत खोल पाणी
आपण बसे मेण्यात
भोई चाले अनवाणी
प्रखर विरोधी बनले
जे करतात विनवणी
जातीलं अन्यआश्रया
तोडून टाकून दावणी
सांभाळा उरले जेवढे
विश्वास मागे छावणी

**हेमंत मुसरीफ पुणे** ९७३०३०६९९६

# गुणवत्तापूर्ण शिक्षण देत असलेल्या जिल्हा परिषद शाळांचे सक्षमीकरण ही काळाची गरज – जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख



**लातूर/प्रतिनिधी :** देशाला मोठ्या त्याग आणि संघर्षातून स्वातंत्र्य मिळाले असून स्वातंत्र्योत्तर काळात जिल्हा परिषद शाळांनी देशाच्या विकासात तसेच लाखो विद्यार्थ्यांना घडविण्यात मोलाचे योगदान दिले आहे. अनेक मान्यवर व्यक्ती जिल्हा परिषद शाळांमधून शिक्षण घेऊन विविध क्षेत्रांत यशस्वी झाल्या आहेत. त्यामुळे जिल्हा परिषद शाळांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन माजी आमदार तथा लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांनी केले.

एकुर्गा जिल्हा परिषद शाळेत आयोजित कार्यक्रमा ते बोलत होते. यावेळी त्यांनी जिल्हा परिषद शाळांसमोरील विविध समस्यांवर भाष्य केले. काही वर्षांपूर्वी वीज बिल न भरल्यामुळे मतदारसंघातील जिल्हा परिषद शाळेची वीज खंडित करण्यात आली होती. त्यावेळी जिल्हा परिषद सदस्य म्हणून आपण स्वतः पुढाकार घेऊन शाळेचे वीज बिल भरले होते, अशी आठवण त्यांनी सांगितली.

याचबरोबर विधानसभेत जिल्हा परिषद शाळांच्या वीज बिलाच्या प्रश्नावर महाविकास आघाडी सरकारचे लक्ष वेधण्यात आले. त्यानंतर पंधराव्या वित्त आयोगाच्या निधीतून ग्रामपंचायतींनी शाळांचे वीज बिल भरण्याचा निर्णय घेण्यात यावा, यासाठी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात आला आणि हा निर्णय मार्गी लागल्याचेही धिरज देशमुख त्यांनी नमूद केले.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी 'रीड लातूर' उपक्रमाच्या माध्यमातून उल्लेखनीय कार्य सुरू असून या उपक्रमात दीपशिखा धिरज देशमुख, जिल्हा परिषद शाळांतील शिक्षक तसेच शिक्षणप्रेमी नागरिकांचे मोलाचे योगदान असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्य आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनी विविध योजनांच्या माध्यमातून शाळांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे. शाळांमध्ये सौर ऊर्जा प्रकल्प, शुद्ध पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे आणि इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर दिला पाहिजे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, शाळा सक्षम व्हाव्यात आणि शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी सुरू असलेल्या विकासकामांच्या पाठीशी जनतेने खंबीरपणे उभे राहावे, असे आवाहनही आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी यावेळी केले. प्रारंभी एकुर्गा जिल्हा परिषद शाळेत नववीच्या तुकडीची मान्यता मिळवून देण्यासाठी यशस्वी पाठपुरावा केल्याबद्दल शाळेच्या व ग्रामस्थांच्या वतीने धिरज विलासराव देशमुख यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास लातूर पंचायत समितीचे सभापती श्रीकांत बैले, उपसभापती महेश चव्हाण, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख, आदींची उपस्थिती होती.


**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**इमारती आणि निवासस्थानांची दुरुस्ती**

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कामे) मध्य रेल्वे सोलापूर आणि मा.भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामांसाठी नामांकित संस्था/कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवीत आहेत. **निविदा सूचना क्र.:** 14-2026-SrDENC; **कामाचे नाव:** ADEN/BG/KWV उपविभागांतर्गत BRB ते KWV या विभागातील कर्मचारी निवासस्थानांची दुरुस्ती; कामाचा **अंदाजित खर्च:** रु. २,९९,९९,९९८.७१; **अनामत रक्कम:** रु. ६,००,०००.००; **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** १२ महिने; **देखभाल कालावधी:** १२ महिने. **निविदा सूचना क्र.:** 15-2026-SrDENC; **कामाचे नाव:** MKPT, AAG, WKA, MA आणि WDS स्थानकांवर Sr ADEN/N/SUR यांच्या अंतर्गत सेवा इमारती आणि निवासस्थानांमध्ये सुधारणा व दुरुस्ती; **कामाचा अंदाजित खर्च:** रु. २,४४,२४,८८४.३२; **अनामत रक्कम:** रु. ४,८८,५००.००; **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** १२ महिने; **देखभाल कालावधी:** १२ महिने. www.ireps.gov.in **या संकेतस्थळावर निविदा अपलोड करण्याची अंतिम तारीख आणि वेळ:** ०२/०७/२०२६ रोजी १५.०० वाजेपर्यंत. www.ireps.gov.in वर **निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ:** ०२/०७/२०२६ रोजी १७.३० वाजता. इच्छुक निविदाकारांना सल्ला दिला जातो की, निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी या निविदेबाबत जारी केलेले कोणतेही बदल किंवा शुद्धिपत्रके पाहण्यासाठी त्यांनी वेळोवेळी संकेतस्थळाला भेट द्यावी. संकेतस्थळ: www.ireps.gov.in

ANJ-21 DRM (कामे), सोलापूर

सुरक्षित प्रवास करा, ट्रेनच्या दरवाजावर उभे राहून प्रवास करणे टाळा.



**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**दगड गिट्टी/ट्रॅक सुधारणा काम**

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कामे) मध्य रेल्वे सोलापूर आणि मा. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामांसाठी नामांकित संस्था/कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवीत आहेत. **निविदा सूचना क्र.:** 05-2026-DEN-Tr. **कामाचे नाव:** OSA डेपो येथे RDSO/LKO च्या फेब्रुवारी २०२३ मधील अद्ययावत तपशीलानुसार (आणि त्यातील सुधारणांसह) ६५ मिमी आकाराची यंत्राद्वारे फोडलेली दगड गिट्टी रेल्वेच्या जागेवर पुरवणे व साठवणे (एकूण ३०,००० घनमीटर); तसेच रॉयल्टी व शुल्कासह ही गिट्टी ADEN च्या सूचनेनुसार रेल्वेच्या हॉपर/वॅगनमध्ये भरणे. **कामाचा अंदाजित खर्च:** रु. ३,२३,४०,०००.००. **अनामत रक्कम:** रु. ६,४६,८००.००. **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** १८ महिने. **देखभाल कालावधी:** नाही **निविदा सूचना क्र.:** 06-2026-DEN-Tr. **कामाचे नाव:** DEN (ट्रॅक) सोलापूर (SUR) अधिकारक्षेत्रांतर्गत ट्रॅकच्या अलाइनमेंटमध्ये (रेषेमध्ये) सुधारणा करण्यासाठी प्रिझम GEDO ट्रॉलीद्वारे सर्वेक्षण करणे. **कामाचा अंदाजित खर्च:** रु. १,८३,८२,६७९.००. **अनामत रक्कम:** रु. ३,६७,७००.००. **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** २४ महिने. **देखभाल कालावधी:** नाही. www.ireps.gov.in या **संकेतस्थळावर निविदा अपलोड करण्याची अंतिम तारीख आणि वेळ:** १०.०७.२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत दोन्ही निविदांसाठी. www.ireps.gov.in वर **निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ: १०.०७.२०२६ रोजी दुपारी ३.३० वाजता** (दोन्ही निविदांसाठी). इच्छुक निविदाकारांना सल्ला दिला जातो की, निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी या निविदेबाबत जारी केलेले कोणतेही बदल किंवा शुद्धिपत्रके पाहण्यासाठी संकेतस्थळाला वारंवार भेट द्यावी. संकेतस्थळ: www.ireps.gov.in.

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कामे). मध्य रेल्वे, सोलापूर.

ANJ-22

सुरक्षित प्रवास करा, फूटबोर्डवरून प्रवास करणे टाळा.



टोनर रिफिलिंग



फक्त ₹ ३००/-

मास्टरप्लेट ट्रेसिंग क्वालिटी

संपर्क

8600025070
9028376965

प्रिंटर्स पॅराडाईस

प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग


Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26

हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादक: दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६